# तहसिलदार दर्यापूर यांचे कार्यालय

जि. अमरावती – ४४४८०२

दूरध्वनी क्र. ०७२२४-२३४२३ ईमेल : tah.daryapur@gmail.com

क्र./कोतवाल भरती/आस्था/अका/कावी 343 /२०२६ दिनांक: २१/०९/२०२६

**कोतवाल संवर्ग सरळसेवा भरती-2026**

**-: जाहीरनामा:-**

**विषय:- महसुल सेवक (कोतवाल) यांचे रिक्त पदे भरण्याबाबत.**

संदर्भ:- 1. मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडील पत्र क्र. कक्ष-21/आस्था-6/कावि-116/2026 दि.15/09/2026

2. दि. 21/09/2026 रोजी पार पडलेल्या कोतवाल आरक्षण सोडतीचे इतिवृत्त.

तालुक्यातील खाली नमूद केलेल्या सजांचे नावा समोर नमुद प्रवर्गानुसार कोतवालाची नेमणुक केली जाणार आहे. तरी ज्या व्यक्तीस कोतवाल म्हणून काम करणेची इच्छा आहे, त्यांनी तहसिलदार दर्यापूर यांचे कार्यालयात दि. **02/10/2026** रोजी सकाळी 11.00 पासून ते दि. **17/10/2026** रोजी सायंकाळी **06.15** (सुट्टीचे दिवस वगळून) वाजे पर्यंत समक्ष पोहोच होईल अशा रितीने विहीत नमुन्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज दाखल करावा. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**महसुल सेवक (कोतवाल) पदनियुक्तीसाठी जात प्रवर्गाचे आरक्षण खालील प्रमाणे**

| अ.क्र | साझ्याचे नाव | आरक्षण प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | वडनेर गंगाई भाग-2 | अराखीव प्रवर्ग |
| २ | सामदा | अराखीव प्रवर्ग |

**1. शैक्षणिक अर्हता:-** उमेदवार किमान ४ थीउत्तीर्ण असावा व त्यास मराठी भाषा व लिहीता व वाचता येणे आवश्यक आहे.

**2. वयोमर्यादा:-**

2.1 सर्व प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी जाहिरनामा प्रसिध्द होणा-या दिनांकास म्हणजे दि.21/09/2026 रोजी किमान १८ वर्षे व कमाल ४० वर्षे वय असावे.

2.2 कोतवाल हे पद वर्ग-अ ते वर्ग-ड अशा कोणत्याही संवर्गात मोडत नाही. सदरील पद हे अवर्गीकृत असल्यामुळे सामाजिक, आर्थिक आरक्षण आणि महिला आरक्षण

Scanned with OKEN Scanner

वगळता अन्य कोणत्याही आरक्षणाच्या तरतुदी व अन्य सवलती जसे की, वयोमर्यादेतील शिथीलता इत्यादी बाबीं कोतवाल भर्तीसाठी लागू असणार नाही.

3. रहिवासः- उमेदवार संबंधित सजामध्ये राहणारा असावा व तो त्याच्या नेमणुकीच्या गावी राहणेस तयार असला पाहिजे.

4. आरक्षणः-

4.1 सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागांच्या बाबतीत अर्जदाराला सक्षम प्राधिका-याने दिलेला जातीचा / प्रवर्गाचा दाखला आणि नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र (लागू असेल तेथे) यांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

4.2 मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले मूळ जात प्रमाणपत्र व मूळ जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणी वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड होणा-या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय क्र. 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि.12/12/2011 यातील तरतुदी अधिन राहुन जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहुन दिल्यानंतर तात्पुरती नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर कमाल ६ महिन्यांच्या विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्रसादर न केल्यास त्याची सेवा आपोआप संपुष्टात येईल.

4.3 अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती वगळुन अन्य प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवारांनी चालू तारखेस वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्राची साक्षंकित प्रत अर्जासोवत जोडणे आवश्यक आहे.

4.4 आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदरावांराकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.१२/०२/२०१९ व दि.३१/०५/२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले चालूतारखेस वैध असणारे ई. डब्लु. एस. (EWS) प्रमाणपत्राचीसाक्षकित प्रत अर्जासोवत सादर करणे आवश्यक राहील.

5. . वर्तणूकः-

5.1 अर्जदारांवर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसावा. अथवा कोणत्याही फौजदारी गुन्ह्यात शिक्षा/दंड झालेला नसावा. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी निवडीनंतर १ महिन्याच्या आत पोलीस निरीक्षक यांचा चारित्र्य पडताळणी दाखला सादर करणे आवश्यक आहे.

5.2 कोतवालास त्याची नेमणूक झाल्यानंतर भारतीय संविधानाशी निष्ठा व्यक्त करणारी विहीत केलेली शपथ घ्यावी लागेल व त्याप्रमाणे आचरण ठेवावे लागेल.

5.3 भरतीप्रक्रिये दरम्यान कोणताही राजकीय / अन्य प्रकारचा दबाव आणल्यास अर्जदारास तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

5.4 अर्जदार हा कोणत्याही राजकीय पक्षाचा अथवा राजकीय संघटनेचा सभासद नसावा.

5.5 अर्जदार हा कोतवाल पदाची कर्तव्ये पार पाडणेसबाधक अथवा हानिकारक होईल अशा कोणत्याही व्यवसायात/कामात गुंतला नसावा.

Scanned with OKEN Scanner

**6. . शारीरीक पात्रताः-**

6.1 अर्जदाराचे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम असावे.

6.2 अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनीनिवडीनंतर १ महिन्याच्या आत शारीरिक क्षमतेबाबतचे मा. जिल्ह शल्य चिकीत्सक अमरावती यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**7. मानधन व सवलती :-**

7.1 शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या दराने व नियमानुसार देय असलेले मानधन तसेच वेळोवेळी देय केलेल्या सवलती कोतवाल पदास अनुज्ञेय असतील.

**8. सेवा शर्ती नियमः-**

8.1 उमेदवारांची नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

8.2 **महसुल सेवक (कोतवाल)** हे पद अवर्गीकृत असून शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या सेवा शर्ती लागू राहतील तसेचत्यांना नियमित वेतन अथवा कोणतेही सेवा निवृत्ती विषयक लाभ मिळणार नाही.

**2. महसुल सेवक (कोतवाल) अर्ज भरण्याची पध्दतः-**

**2.1** अर्ज हा कार्यालयाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यातच असावा, अन्यथा असा अर्ज फेटाळणेस पात्र राहील.

**2.2** सदर अर्जावर. रु.५/- ची कोर्ट स्टॅम्प फी लावणे आवश्यक आहे. अन्यथा असा अर्ज फेटाळणेस पात्र राहील.

**2.3** जाहिराती सोबत प्रसिध्द करण्यात येत असलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज त्यामधील माहिती / तपशिल सुस्पष्टपणे नमूद करुन सादर करावा. अपूर्ण असलेले अर्ज फेटाळणेस पात्र राहील.

2.4 उमेदवाराने त्यांचे अलीकडील काळातील रंगीत छायाचित्र अर्जावर विहीत जागी स्वसाक्षांकित करुन घट्ट चिकटवावे. याशिवाय अतिरिक्त तीन रंगीत छायाचित्रे अर्जासोबत द्यावीत.

2.5 अर्जा सोबत लहान कुटूंबाचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. त्याचा नमूना या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केला आहे.

2.7 शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन अर्जासोबत जोडाव्यात.

2.8 अर्जासोबत जातीच्या प्रमाणपत्राची व जात वैधता प्रमाणपत्राची (असल्यास) छायांकित प्रत साक्षांकित करुन जोडावी.

2.9 अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त मागास प्रवर्गातील सर्व उमेदवारांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे चालु तारखेस वैध असणारा नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी. तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक उमेदवारांनी चालु तारखेस वैध असणाराई. डब्लू.एस. प्रमाणपत्राची चालू साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

Scanned with OKEN Scanner

2.10 इतर मागासवर्गीय प्रवर्गातील उन्नत/प्रगत (क्रिमीलेअर) व्यक्तींना इतर मागासवर्गीय प्रवर्गाचे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

2.11 अर्जदार ज्या आरक्षित प्रवर्गातून अर्ज करणार आहे, तो प्रवर्ग अर्जामध्ये अचूक रितीने नमूद करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्याने ज्या साझासाठी अर्ज केला आहे तो अचूक रितीने नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर अर्ज फेटाळणेस पात्र राहील. याबाबत नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

2.12 अर्जदाराने ज्या साझासाठी अर्ज केला आहे केवळ त्याच साझासाठी त्याच्या अर्जाचा विचार केला जाईल. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी ज्या प्रवर्गातून अर्ज केला आहे, त्याच प्रवर्गातून त्याच्या अर्जाचा विचार केला जाईल. याबाबत कोणतीही तक्रार नंतर चालणार नाही.

2.13 प्रत्येक साझासाठी आरक्षण सोडतीमध्ये निश्चीत झालेप्रमाणे आरक्षण लागू राहील. तथापि सदर आरक्षित प्रवर्गामधून एकही अर्ज प्राप्त न झालेस आणि/अथवा त्याऐवजी अन्य प्रवर्गामधून अर्ज प्राप्त झालेस याबाबतलागू शासकीय नियमानुसार कार्यवाही करणेत येईल. याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

2.14 कागदपत्रांसह संपूर्ण भरलेले अर्ज तहसिल कार्यालय दर्यापूर येथे दि.02/10/2026 रोजी सकाळी 11.00 पासून ते दि. 17/10/2026 रोजी सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावे. विहीत मुदतीनंतर व विहीत वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच पोष्टाने अथवा ईमेलव्दारे प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. या संबंधाने उमेदवारा सोबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

2.15 विहीत नमुन्यातील नसलेला अर्ज, विहीत शुल्क भरणा न केलेल्या उमेदवाराचे अर्ज, विहीत शैक्षणिक / रहिवास / जात प्रवर्ग इत्यादी अर्हता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करुन न जोडलेले अर्ज, फोटो नसलेला व स्वसाक्षांकित न केलेला अर्ज आणि विहीत मुदतीनंतर प्राप्त होणाराव विहीत मार्गाने प्राप्त न होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत वत्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

2.16 अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची/संघटनेची/व्यक्तिची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा सदरील अर्ज तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

2.17 अर्जामध्ये खोटी, चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरवले जाईल.

**3. कोतवाल पदाकरीता अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे-**

3.1 इयत्ता चौथी उत्तीर्ण गुणपत्रिका किंवा महत्तम प्राप्त शैक्षणिक गुणवता दर्शविणारी गुण पत्रिका/सनद.

3.2 शाळा सोडलेचा दाखला किंवा जन्मतारखेचा उल्लेख असलेले बोनाफाईड प्रमाणपत्र किंवा १० वी सनद किंवा जन्म दाखला.

3.3 साझातील रहिवासी असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र किंवा (घर टॅक्स पावती, राशन कार्ड/मतदानकार्ड/आधारकार्ड) यापैकी एक पुरावा जोडणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

3.4 अर्जासोबत आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची स्वसांक्षाकित प्रत जोडावी

3.5 आरक्षित पदाचे अर्जा करीता जातीचे प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास), इतर मागासवर्गाकरीता उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचालु तारखेस वैध असणारेप्रमाणपत्र (No Creamy Layer Certificate), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांसाठी चालू तारखेचे EWS प्रमाणपत्र (जे लागू असेल ते) जोडणे अनिवार्य आहे. आवश्यक प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. तसेच उमेदवाराची नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासुन ६ (सहा) महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुर्वसूचना अथवा कोणतेही कारण न देता तात्काळ नियुक्ती रदद करण्यात येईल.

3.6 सर्व कागदपत्रांच्याछायांकित प्रती साक्षांकित करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच सर्व मूळ कागदपत्रे ही कागदपत्र पडताळणीचे वेळेस सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा सदर उमेदवारास अपात्र ठरविले जाईल.

**4. परीक्षा शुल्कः-**

4.1 उमेदवारांनी खालील प्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

| प्रवर्ग | खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी (महिलांसह) | अ.ज., अ.जा. विजाअ/भजब/भजक/भजड, इ.मा.व. व ई.डब्लु.एस. उमेदवारांसाठी (महिलांसह) |
|---|---|---|
| परीक्षा शुल्क | रु.५००/- (पाचशे मात्र) | रु.३००/- (तीनशे मात्र) |

4.2 परीक्षा शुल्क हे डी.डी. साठी लागणारे बँकचे शुल्क / सेवाकर इत्यादी वगळून आहे.

4.3 वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क "तहसिलदार दर्यापूर " या नावाने कोणतेही राष्ट्रीयीकृत बँकेचे येथे देय असणारे डी.डी. (डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत सादर करावा. डी.डी. वगळता अन्य कोणत्याही मार्गाने परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

4.4 परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) व अपरिवर्तनीय (Non-Transferable) राहील.

**5. परीक्षा पध्दती व निकालः-**

परीक्षा पध्दतीः-

5.1 महसुल सेवक (कोतवाल) पदाचे निवडी करीता महसुल व वनविभाग शासन निर्णय दि. १७/०५/२०२३ अन्वये विहीत केलेप्रमाणे १०० गुणांची लेखी परीक्षा असेल. लेखी परीक्षा दि. 11/11/2026 रोजी दुपारी 12.00 ते 1.30 पर्यत दरम्यान प्रवेशपत्राव्दारे कळविण्यात

Scanned with OKEN Scanner

आलेल्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. यासाठी उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी 11.00 पूर्वी उपस्थित रहावे. उशीरा येणा-या उमेदवारांना परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

5.2 लेखी प्रश्नपत्रिका इयत्ता चौथी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. सदर प्रश्नपत्रिकेत एकूण ५० प्रश्न असून प्रत्येक बरोबर उत्तरासाठी २ गुण मिळतील. चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा होणार नाहीत.

5.3 लेखा परिक्षेत सामान्य ज्ञान, अंकगणित, मराठी भाषा, अमरावतीजिल्हयाची भौगोलिक व ऐतिहासिक माहिती यांचा समावेश राहील.

5.4 गुणवत्ता क्रम हा लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर म्हणजेच एकुण १०० गुणांपैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर राहील.

5.5 किमान पात्रता गुणांबाबत तसेच पात्रतेसाठी एकाहून अधिक उमेदवारांना समसमान गुण मिळाल्या प्रकरणीसामान्य प्रशासन विभागाचे दि. २७/०६/२००८ चे शासन निर्णयातील लागू तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

5.6 निवड करण्यात आलेले उमेदवार निवड झाल्यापासून १५ दिवसाच्या आत रुजू न झाल्यास प्रतिक्षाधिन यादी मधील पुढील उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

5.7 उमेदवाराचे मुळ दस्ताऐवज पडताळणी केल्यानंतरच अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येईल.

5.8 परीक्षेच्या दरम्यान कोणतेही अनुचित / बेकायदेशीर कृत्य करणा-या अथवा करण्याचा प्रयत्न करणा-या उमेदवारांना भरती प्रक्रियेतून तात्काळ अपात्र ठरविले जाईल.

6. <u>उत्तर तालिकाः-</u>

6.1 परीक्षा पार पडलेनंतर उत्तर तालिका तहसिल कार्यालय दर्यापूर व उपविभागीय अधिकारी कार्यालय दर्यापूर येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर उत्तरतालिका अंतिम राहील व त्यावर कोणतेही आक्षेप स्विकारले जाणार नाहीत.

6.2 लेखी परीक्षेचा निकाल उमेदवारांच्या आसन क्रमांकाच्या यादीसह तहसिल कार्यालय दर्यापूर व उपविभागीय अधिकारी कार्यालय दर्यापूर येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

6.3 लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे संवर्ग निहाय व साझानिहाय उमेदवारांची प्राथमिक निवडसुची तयार केली जाईल.

Scanned with OKEN Scanner

7. **कोतवाल भरतीचा कालबध्द कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.**

| क्र. | तपशिल | निश्चित केलेला अंतिम दिनांक |
|---|---|---|
| 1 | कोतवाल भरती प्रक्रियेसंदर्भात जाहीरनामा प्रसिध्द करणे | दि. 21/09/2026 |
| 2 | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दि.02/10/2026 ते दिनांक **17/10/2026** |
| 3 | अर्जाची छाननी करुन पात्र / अपात्र अर्जाची यादी प्रसिध्द करणे | दि.18/10/2026 ते **01/11/2026** |
| 4 | लेखी परिक्षा | दिनांक 11/11/2026 |
| 5 | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दिनांक **12/11/2026** |
| 6 | निवड सूचीतील पात्र उमेदवारांची मूळ कागदपत्रे पडताळणी करणे | दिनांक **21/11/2026 ते 27/11/2026** |
| 7 | अंतिम निवडसूची आणि प्रतीक्षाधिन उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दिनांक **26/11/2026** |

तथापि अपरीहार्य कारणास्तव वरील कार्यक्रमात बदल करणेचासंपूर्ण अधिकार निवड समितीकडे असून प्रकरणी सुधारित कार्यक्रम तपशिल तहसिल कार्यालय दर्यापूर व उपविभागीय अधिकारी कार्यालय दर्यापूर ल नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत येईल.

ठिकाणः दर्यापूर        दिनांकः- 21/09/2026

**सदस्य सचिव**
**कोतवाल निवड समिती,**
**तथा तहसिलदार दर्यापूर**

टिपः- कोतवाल पदासाठी करावयाच्या अर्जाचा विहीत नमुना व त्यासोबत प्रवर्ग निहाय सादर करावयाची कागदपत्रांची यादी तहसिल कार्यालय दर्यापूर येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. तसेच कोणत्याही उमेदवारास कोणतीही अडचण आलेस तहसिल कार्यालय दर्यापूर येथे कार्यालयीन वेळेत निवासी नायब तहसिलदार, दर्यापूर यांचेशी संपर्कसाधावा.

प्रतः-गट विकास अधिकारी दर्यापूर

Scanned with OKEN Scanner

२/सोबत जाहिरनाम्याची प्रत पाठविलेली असून सदरची प्रत पंचायत समितीच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

प्रतः---तलाठी/ग्रामसेवक ता. दर्यापूर

२/-सदरचे जाहीर निवेदन गावचे चावडी बोर्डावर/ग्रामपंचातीच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावे. तसेच गावी दवंडी देवून निवेदन प्रसिध्द केलेबाबतचे दवंडी रजिस्टर उतारेसह टपाली अहवाल या कार्यालयात सादर कराव्यात.

सदस्य सचिव
कोतवाल निवड समिती,
तथा तहसिलदार दर्यापूर

प्रत,

१. मा. जिल्हाधिकारी अमरावती. (आस्थापना शाखा) यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. मा. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती. सदर जाहीरनामा प्रसिध्दीसाठी सविनय सादर

३. मा. उपविभागीय अधिकारी दर्यापूर तथा अध्यक्ष, कोतवाल निवड समिती यांना माहितीसाठी सविनय सादर.मा. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती यांचेकडे योग्य त्या प्रसिध्दीसाठी सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner